आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२१ ऑगस्ट २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- सरकारी कार्यालयं, विद्यापीठ आणि युवकांमधला संवाद वाढवण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं केंद्रीय सचिवांना आवाहन

- उज्ज्वल भविष्यासाठी नवसंशोधन, सहकार्यावर भर देण्याचं भारताचं ब्रिक्स देशांना आवाहन

- न्यायाधीशपदाची परीक्षा देणाऱ्यांसाठी सर्वोच्च न्यायालयाकडून पुर्वानुभवाची अट शिथिल

आणि

- FIH विश्वचषक हॉकी स्पर्धेत आज भारतीय महिला संघाचा सामना नेदरलँड्स बरोबर

**<><><><>**

सर्व सरकारी विभागांमध्ये आणखी चांगला संवाद व्हावा, विद्यापीठं आणि युवकांनी धोरणनिर्मितीत नव्या संकल्पना आणाव्यात, विद्यापीठं आणि युवकांशी व्यापक संवाद असेल, तर त्यातून नव्या आणि अभिनव कल्पना समोर येतात, असं मत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलं. केंद्र सरकारच्या विविध विभागांच्या सचिवांची तिसरी उच्चस्तरीय बैठक प्रधानमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्लीत झाली, त्यावेळी ते बोलत होते. देशाचं भविष्य कसं घडवायचं, याचा दूरदृष्टीने विचार करावा, असं आवाहन त्यांनी सचिवांना केलं. डेटा ही राष्ट्रीय संपत्ती आणि भविष्यासाठी एक महत्त्वाचं संसाधन असून त्याचा आणखी सुसंगत आणि परिणामकारक वापर करायला हवा, असं ते म्हणाले. सरकारी विभागांचं एकमेकांपासून विलग राहून काम करणं ही फक्त संस्थात्मक समस्या नसून विचारसरणीतली समस्या आहे, असं सांगून, अधिकाऱ्यांनी आपलेपणाने काम करावं, अशी सूचना प्रधानमंत्र्यांनी केली. आपल्या कनिष्ठ सहकाऱ्यांशी अनौपचारिक संवाद वाढवावा, त्यांच्यात संघभावना जागवावी, असंही त्यांनी सुचवलं. देशाचं संरक्षण क्षेत्र जागतिक पातळीवरच्या स्पर्धेत आणखी बळकट करणं गरजेचं असल्याचं मोदी म्हणाले. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मानवी कौशल्यांची योग्य सांगड घालायला हवी, याकडे त्यांनी लक्ष वेधलं.

**<><><><>**

उज्ज्वल भविष्यासाठी ब्रिक्स देशांनी नवसंशोधन, सहकार्य आणि आमूलाग्र बदल घडवण्यावर भर द्यावा असं आवाहन भारतानं ब्रिक्स देशांना केलं आहे. ब्रिक्स देशांच्या दूरसंचार मंत्र्यांची १२ वी बैठक आज पुण्यात सुरू झाली. त्यावेळी दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी ही भूमिका मांडली. डिजिटल अडथळे दूर करुन शाश्वत, नवोन्मेषाला चालना देणारी, क्षमता वर्धन करणारी आणि डिजिटल बदल घडवणारी व्यवस्था घडवण्यासाठी सहकार्य वाढवण्याचं आवाहन त्यांनी यावेळी ब्रिक्स देशांना केलं.

यावेळी भारत आणि ब्राझिलमध्ये सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली. दूरसंचार, सायबर सुरक्षा, उद्योन्मुख तंत्रज्ञान, क्षमता विकास आणि तंत्रज्ञानाची देवाणघेवाण वाढवण्यावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली.

ब्रिक्स देशांच्या पर्यटन मंत्र्यांची बैठक आज दुपारी जयपूरमध्ये सुरू होणार आहे.

<><><><><>

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी भारत- सिंगापूर आर्थिक भागीदारी बळकट करण्याची वचनबद्धता व्यक्त केली. भारत - सिंगापूर व्यापार मंचाच्या बैठकीत ते आज उभय बाजूचे उद्योजक आणि इन्सीड या शैक्षणिक संस्थेच्या आजी माजी विद्यार्थ्यांना संबोधित करत होते. त्यांनी भारताचा भक्कम वाढीचा आलेख, गुंतवणूक संधी आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारचं व्यवसाय सुलभ धोरण याबद्दल सविस्तर माहिती दिली. गोयल यांनी सिंगापूरचे परराष्ट्र व्यापार राज्यमंत्री गान स्यो हुआंग आणि इतर पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन भारतीय कृषीमालाच्या निर्यातीबद्दल चर्चा केली.

<><><><><>

भारतीय टपाल विभागातर्फे एक सर्वेक्षण केलं जात असून यात २० हजार रुपयांचं रोख इनाम दिलं जातं, अशा अर्थाची पोस्ट सध्या समाजमाध्यमांवर फिरत आहे. मात्र ही पोस्ट बोगस असून त्यातली माहिती खोटी आहे, असं पत्र सूचना कार्यालयानं स्पष्ट केलं आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये आणि स्वतःची वैयक्तिक माहिती उघड करू नये , असं आवाहनही केलं आहे.

<><><><><>

न्यायिक सेवा परीक्षा देण्याच्या अर्हतेत किमान तीन वर्षं वकिली व्यवसायाची अट सर्वोच्च न्यायालयाने शिथिल केली आहे. आता केवळ एक वर्ष वकिली व्यवसाय केलेले

उमेदवार ही परीक्षा देऊ शकतील, मात्र नंतर त्यांना न्यायिक अकादमीत प्रशिक्षण पूर्ण करून एक वर्ष सहाय्यक म्हणून काम करावं लागेल. हा नियम १ एप्रिल २०२७ नंतर जारी होणाऱ्या अधिसूचनेतल्या परीक्षांना लागू होईल.  सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत, न्यायमूर्ती ए जी मसीह, आणि न्यायमूर्ती के विनोद चंद्रन यांनी हा निवाडा दिला. २५ मे २०२५ ते ३१ मार्च २०२७ या काळात अधिसूचना जारी झालेली परीक्षा देणाऱ्या उमेदवारांना पूर्वानुभवाची अट घातली जाणार नाही. त्यांना एका वर्षासाठी प्रशिक्षणार्थी न्यायिक अधिकारी म्हणून नेमणूक दिली जाईल. आणि नंतर एक वर्षभर न्यायालय सहाय्यक पदावर काम करावं लागेल, असं न्यायालयाने स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

झारखंड कर्मचारी निवड आयोगाच्या परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांच्या नेमणुका, तसंच बाल विकास प्रकल्प अधिकाऱ्यांच्या नेमणुका रद्द करणाऱ्या अधिसूचनेला झारखंड उच्च न्यायालयानं आज स्थगिती दिली. झारखंड लोकसेवा आयोगाच्या ११व्या आणि १३व्या परीक्षा रद्द करण्याच्या अधिसूचनेलाही न्यायालयानं काल स्थगिती दिली होती. नियुक्ती प्रक्रियेतल्या कथित घोटाळ्यांवरून झालेल्या आंदोलनामुळे झारखंड सरकारनं २२ परीक्षा रद्द केल्या होत्या, तसंच २०१४पासून झालेल्या २३ इतर परीक्षांची चौकशी करायचे आदेश दिले होते.

**<><><><><>**

इराणशी संबंधित सर्व जलमार्गांवर अमेरिकेची पकड असून लौकरच पूर्ण नियंत्रण मिळवू असं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी म्हटलं आहे. एका खासगी नभोवाणी वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत इराणविरुद्धच्या लष्करी कारवाईचं समर्थन करताना ते म्हणाले की, इराणला कधीही अण्वस्त्र मिळू देणार नाही. इराणचं लष्करी सामर्थ्य नेस्तनाबूत झालं असून क्षेपणास्त्र किंवा ड्रोन बनवण्याची क्षमताही संपली आहे, असा दावा त्यांनी केला. इराणमधे लष्कराचे पगार थकले असून महागाई वाढत आहे, याचा दबाव तिथल्या सरकारवर असल्याचं ट्रंप म्हणाले.  या संघर्षामुळे अमेरिकेत इंधन महाग होऊ शकतं, हे त्यांनी मान्य केलं.

दरम्यान  आर्थिक चणचण असल्याचा इराणने इन्कार केला आहे. डोनाल्ड ट्रंप यांच्या असफल धोरणामुळे वातावरण अधिकाधिक बिघडत असल्याचा आरोप इराणचे परराष्ट्र मंत्री

अब्बास अराघची यांनी केला. अमेरिकेतल्या अंतर्गत आर्थिक प्रश्नांवरुन तिथल्या नागरिकांचं लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी ट्रंप यांची ही धडपड असल्याचं त्यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. अभूतपूर्व आर्थिक निर्बंध घालून इराणला एकटं पाडण्याचा निर्धार अमेरिकेच्या अर्थमंत्र्यांनी काल जाहीर केला. त्यावर अमेरिकेचा आर्थिक दहशतवाद जागतिक अर्थव्यवस्थेला आणि अनेक राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाला धोका असल्याची प्रतिक्रीया अराघची यांनी दिली.

<><><><>

हेझबोला ही सशस्त्र संघटना इराणला समर्थन देत असल्याचं जाहीर करुन अमेरिकेनं त्यावर आणखी आर्थिक निर्बंध लागू केले आहेत. हेझबोलाला वित्तपुरवठा केल्याचा आरोप करत अमेरिकेनं १० व्यक्तींविरुद्ध निर्बंध लावले आहेत. लेबनॉन, तुर्किये, संयुक्त अरब अमिराती, आणि इराण दरम्यान मोठ्या प्रमाणावर हवाईमार्गाने कुरियर पाठवून पैसा आणि मालाची देवाणघेवाण केली जाते, असं अमेरिकेचं म्हणणं आहे.

<><><><>

पाकिस्तानचे माजी प्रधानमंत्री इम्रान खान यांना वैद्यकीय तपासणीनंतर पुन्हा रावळपिंडी तुरुंगात हलवण्यात आलं आहे. अतिशय अस्वस्थ वाटत असल्याची तक्रार त्यांनी केल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार १८ ऑगस्टला त्यांना शिफा रुग्णालयात दाखल केलं होतं.

<><><><>

नेदरलँड्समध्ये सुरु असलेल्या एफ आय एच विश्वचषक हॉकी स्पर्धेत आज भारतीय महिलांचा मुकाबला यजमान संघाशी होणार आहे, दुसऱ्या फेरीतल्या या सलामीच्या सामन्याला भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री साडे नऊ वाजता सुरुवात होईल. त्याआधी काल भारतीय महिला संघाच्या इंग्लंडबरोबर झालेल्या ई फेरीतल्या अखेरच्या सामन्यात दोन्ही संघांनी एकही गोल केला नाही.

//<><><><>//